**ब्रिक्स परिषदेच्या पार्श्वभूमीवर रिओ दि जानेरो येथे पंतप्रधानांची बोलिव्हियाच्या राष्ट्राध्यक्षांशी भेट (07 जुलै 2025)**

07 जुलै 2025

ब्राझीलमधील रिओ दि जानेरो येथे आयोजित ब्रिक्स परिषदेच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी बोलिव्हियाचे राष्ट्राध्यक्ष महामहिम लुईस आर्से कॅटाकोरा यांची भेट घेतली.

2. दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय सहकार्याचा आढावा घेतला आणि साध्य झालेल्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी त्यांनी महत्त्वाची खनिजे, व्यापार आणि वाणिज्य, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि UPI, आरोग्य आणि औषधनिर्माण, पारंपरिक औषधे, लघु आणि मध्यम उद्योग, प्रशिक्षण आणि क्षमता निर्माण या क्षेत्रांतील सहकार्याबाबत चर्चा केली. दोन्ही नेत्यांनी महत्त्वाच्या खनिजांच्या क्षेत्रात सहयोग वाढविण्यासाठीच्या तसेच या क्षेत्रात शाश्वत आणि परस्पर लाभदायक भागीदारी विकसित करण्याच्या संधी लक्षात घेतल्या. जलद प्रभाव प्रकल्प आणि ITEC शिष्यवृत्ती कार्यक्रमांतर्गत क्षमता निर्माण उपक्रमांसह दोन्ही देशांमध्ये सुरू असलेल्या विकास सहकार्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

3. बोलिव्हियातील ला पाझ आणि देशाच्या इतर अनेक भागांमध्ये मार्च-एप्रिल 2025 मध्ये आलेल्या भीषण पुराच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी बोलिव्हियाच्या जनतेसोबत ऐक्यभाव व्यक्त केला. आंतरराष्ट्रीय सौर आघाडीत सहभागी झाल्याबद्दल त्यांनी बोलिव्हियाचे अभिनंदन देखील केले.

4. बोलिव्हिया स्वतंत्र झाला त्यास 6 ऑगस्ट 2025 रोजी 200 वर्षे पूर्ण होत आहेत, त्या पार्श्वभूमीवर देशाच्या द्विशताब्दी सोहळ्यानिमित्त पंतप्रधानांनी बोलिव्हियाचे सरकार तसेच जनतेला शुभेच्छा दिल्या.

**रिओ दि जानेरो**

**07 जुलै 2025**